विद्याविकास

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**विद्यार्थी विकास मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. सविता कुलकर्णी**
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६–२७/२११ दिनांक : २५/०८/२०२६

प्रति,
**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यावये व मान्यताप्राप्त परिसंस्था/
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : 'जल्लोष–२०२६' विभागीय/जिल्हास्तरीय आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाबाबत.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये विभागीय/जिल्हास्तरीय/विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवाचे प्रत्यक्ष आयोजन माहे सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात प्रस्तावित आहे.

या महोत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थी कलावंतांचा आगामी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवाकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघात समावेश करण्यासाठी प्राधान्याने विचार केला जाईल. जल्लोष–२०२६ विभागीय/जिल्हास्तरीय युवक महोत्सवात सहभागी होण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील/विभागातील इच्छुक सांस्कृतिक समन्वयक/विद्यार्थी कल्याण अधिकारी/संघ व्यवस्थापकांसह विद्यार्थी, कलामंच, रंगमंच व संबंधित विभागांना सदर युवक महोत्सवातील सहभागाची पूर्वतयारी करण्याबाबत सूचित करावे.

माहे सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात प्रस्तावित **जल्लोष–२०२६ विभागीय/जिल्हास्तरीय युवक महोत्सवाच्या आयोजक महाविद्यालयाचे नाव, ठिकाणा व नावनोंदणीबाबत सविस्तर व स्वतंत्र परिपत्रकाद्वारे** आपणास कळविले जाईल. कळावे, ही विनंती.

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ